PEOPLE FOR THE ETHICAL TREATMENT OF ANIMALS

PETA India
PO Box 28260
Juhu, Mumbai
400 049
(22) 4072 7382
(22) 2636 7383 (fax)

Info@petaindia.org
PETAIndia.com

NEWS RELEASE

**For Immediate Release:**
**18** March 2015

**Contact:**
Dr Manilal Valliyate +91 9820947382; ManilalV@petaindia.org
Sachin Bangera +91 9820122561; SachinB@petaindia.org

## 'बंधन' मधील हत्तीचे पिलू पाण्यापासून वंचित, गळूवर उपचार न केल्यामुळे हाल

**ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडिया – अधिकृत व्हेटेरिनरी इन्स्पेक्शन टीमने त्याची तात्काळ निवाऱ्यात पाठवणी करण्याची मागणी केली.**

मुंबई – प्रकल्प प्रमुखांसह व्हेटेरिनरी इन्स्पेक्टर्सची एक तुकडी (केरळ मधील पशूवैद्यक आणि पशू विज्ञान महाविद्यालयातील हत्तींच्या अभ्यासाचे केन्द्र) आणि ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियामधील (एडब्ल्यूबीआय) सहसदस्य व मानद पशूस्वास्थ्य अधिकारी यांनी सुमन नावाच्या ३ वर्षांच्या हत्तीचा दुष्टपणे आणि बेकायदेशिरपणे करण्यात येणाऱ्या उपयोगाची नोंदणी केली आहे. सध्या ह्या हत्तीचा झी टेलेव्हिजनवरील गुजरातमधील बंधन ह्या मालिकेत उपयोग करण्यात येत असून त्याचा *माहूत* त्याचा सांभाळ करत आहे. सुमनची पुनर्वसनासाठी तात्काळ प्रतिष्ठाप्राप्त पशू निवाऱ्यात पाठवणी करण्याची तज्ञांनी शिफारस केली आहे. तपासनीसांनी प्राण्यांना दुष्टपणाची वागणूक देण्यास प्रतिबंध करणारा कायदा, १९६० आणि भारतीय वन्यजीव (संरक्षण) कायदा, १९७२ मधील अनेक तरतुदींचे उल्लंघन केले असल्याचे पर्यवेक्षकांनी नमूद केले असून त्यात बेकायदेशिर भेटवस्तू कराराचा समावेश आहे आणि महाराष्ट्र वनखात्याने मालकी प्रमाणपत्र रद्द करून सुमनला ताब्यात घ्यावे अशी शिफारस केली आहे. **एडब्ल्यूबीआयच्या पर्यवेक्षकांच्या अहवालाची प्रत त्याचप्रमाणे सुमनच्या दैन्याचा पुरावा देणारी छायाचित्रे पिटापाशी उपलब्ध आहेत,** ज्यांच्या ब्रीदवाक्यात असे नमूद करण्यात आले आहे की ''प्राण्यांवर आपला करमणुकीसाठी हक्क नसतो.''

तपासणी संघाच्या असे निदर्शनास आले की सुमनला एका लहान, घट्ट नायलॉनच्या दोरीने बंदिस्त करण्यात आले आहे. तिला तीव्र स्वरूपाचा त्वचेचा संसर्ग देखील झाला आहे आणि तिच्या लिंबूच्या आकाराच्या एका गळूवर उपचार करण्यात आलेले नाहीत. तिच्या एकसारख्या प्रकारच्या वर्तनातून तिला खूप मानसिक ताण असल्याचे दिसून येते उदा. सारखी सोंड हलवणे, झुलणे आणि सेटवर नसताना डोके हलवणे. .पर्यवेक्षकांच्या समक्ष तिच्या काठी घेतलेल्या माहूताने तिला भीती दाखविली आणि तिला पिण्यासाठी पुरेसे पाणी देण्यात आले नव्हते. योग्य निवारा किंवा आवश्यक पशूवैद्यकीय सेवा देण्यात आली नव्हती.

''ह्या हत्तीच्या पिलाला तिच्या ह्या अगदी कमी वयात सर्व गोष्टींचा तुटवड्याचा अनुभव आला होता आणि तिला आता वाचविण्याची गरज आहे त्यामुळे तिला आवश्यक असलेली आणि तिचा अधिकार असलेली खास सेवा मिळू शकेल,'' पिटाच्या चीफ एक्झिक्युटिव ऑफिसर पूर्वा जोशीपूरा सांगतात. ''प्रॉडक्शनच्या सेटवरील सर्व प्राण्यांचे हाल होण्यापासून त्यांचे रक्षण करण्यासाठी पिटा फक्त इच्छूक माणूस कलाकारांचा उपयोग करण्याचे आवाहन चित्रपट निर्माते आणि टेलेव्हिजन प्रोड्यूसर्स यांना करत आहे.''

हत्तीला मारणे आणि त्याचे हाल करणे हे जरी बेकायदेशिर असले तरी पाळलेल्या हत्तींना हिंसक पद्धतीने शिकविले जाते. माहूत हत्तींना क्रालमध्ये (बंदिस्त जागा) जबरदस्ती कोंबून त्यांचे अगदी खास पद्धतीने खच्चिकरण करतात, जेथे ते हलू शकत नाहीत किंवा त्यांच्या सर्व आशा संपुष्टात येईपर्यंत त्यांना दोन झाडांना बांधून आणि अंकुशाने (एका टोकाला हूक असलेले लोखंडाच्या पोकरसारखे हत्यार) किंवा काठीने त्यांना मारतात. एखाद्या टेलेव्हिजन सेटवर सातत्याने होणारे रिटेक्स आणि माहूताचे आदेश ह्यामुळे देखील प्राण्यांसाठी अतिशय भीतीदायक वातावरण निर्माण होते, ज्यांना त्यांच्या भोवती काय घडत आहे हे समजत देखील नाही.

अधिक माहितीसाठी कृपया येथे भेट द्या: **PETAIndia.com**.

#

Affiliates:
- PETA US
- PETA Foundation (UK)
- PETA Asia-Pacific
- PETA Germany
- PETA Netherlands

Registered Office:
H-341, Ground Floor
New Rajendra
Nagar, New Delhi
110 066